प्रस्तुत प्रतिज्ञापत्र मी दाखल केले असून ते वाचले आहे व त्यात लिहिलेला संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्याखाली मी माझी सही केली आहे.

**पुढील सरतपास तोंडीस्वरूपात नव्या शपथेवर तक्रारदारातर्फे श्री.देशपांडे वकील यांचेमार्फत.**

मला दि.१०.०९.१९९८ रोजी वनसंरक्षक यांनी दिलेले पत्र नि.**यु.९** वर आहे. माझे वयाची ६० वर्षे पुर्ण झाल्यावरून मला दि.३०.०६.२००० पासून रोजंदारी कामावरून कमी करण्यात येत असल्याबाबत सामनेवालाने दिलेल्या ज्ञापनाची प्रत नि.**यु.१०** वर आहे. सामनेवालाने मला दि.१८.०५.२००४ रोजी दिलेले पत्र नि.**यु.११** वर आहे.

**उलटतपास सामनेवालेतर्फे श्रीमती चितापुरे वकील यांचेमार्फत.**

१. मी इयत्ता तीसरी पास आहे. मला मराठी लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की मी सामनेवालाकडे १९८२ साली ही कामास नव्हतो व १९८४ साली ही कामास नव्हतो. आता मला मी यादी नि.क्र.यु.२ सोबत अ.क्र. ४ वर दाखल केलेल्या कामगारांच्या यादीची प्रत दाखविण्यात आली. हे खरे आहे की त्यात अ.क्र.११० वर माझे नाव नमुद आहे. (यादीच्या प्रतीस उलटतपासणी कामी वापरल्याने नि.क्र.**यु.१२** देण्यात आले.) हे खरे आहे की त्या यादी मध्ये माझी जन्म तारीख १६.०८.१९५०, शिक्षण इयत्ता पाचवी व कामास लागल्याची तारीख ०१.११.१९८४ नमुद करण्यात आली आहे. मी सामनेवालाकडे १९८२ साली कामास लागलो होतो हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझेकडे नाही. हे खरे आहे की त्या यादीमध्ये माझी जन्म तारीख १६.०८.१९५० अशी दाखवली आहे ती विचारात घेता माझी सेवानिवृत्तीचे वर्ष २०१० हे होते मात्र तरीही मला २००० सालीच कामावरून कमी करण्यात आल्याबाबत मी या आधी कुठलीही तक्रार केलेली नाही. हे खरे आहे की नि.यु.१० नुसार मला २००० साली कामावरून कमी करण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे.

२. सामनेवालेकडे मी वनरक्षक पदावर कार्यरत होतो. सामनेवालाकडे मी वनमजुर म्हणुन कधीही काम केलेले नाही. माझे तक्रार अर्जात मी रोजंदारी वनमजुर म्हणुन कामास लागल्याचा उल्लेख कसा नमुद करण्यात आला ते मी सांगु शकत नाही. हे खरे आहे की काम

उपलब्ध असेल तेंव्हा मला काम दिले जात असे व त्या कामाचा मोबदला दिला जात असे. स्वत:हुन सांगतो की सामनेवालेकडे काम निरंतर उपलब्ध राहत असे. मी कामाला लागलो त्यावेळी मला दिड रूपया रोजाप्रमाणे दरमहा पगार सामनेवाले देत असत. माझा शेवटचा पगार २००० साली रू.१,२००/— महिना इतका होता. हे खरे आहे की मला सुरूवातीचा पगार रोजगार हमी योजनेअंतर्गत देण्यात येत होता. हे म्हणणे खरे नाही की मी रोजगार हमी योजनेअंतर्गत कामाला असल्याने कोणत्याही वर्षात माझे कामाचे २४० दिवसांपेक्षा जास्त दिवस भरले नव्हते व मी सामनेवाले यांचेकडे २००० सालापर्यंत कधीही पाच वर्षे सलग सेवा दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की सामनेवाले यांनी शासनास सादर केलेल्या यादीमध्ये माझे नाव नव्हते कारण मी रोजगार हमी योजनेवर काम करत होतो. हे म्हणणे खरे नाही की मी रोजगार हमी योजनेवरच कार्यरत होतो त्यामुळे कायमपणाचे फायदे मिळण्यास मी पात्र नव्हतो व नाही. हे म्हणणे खरे नाही की मला सेवेत कायम करण्यात आले नाही याबाबत मी कधीही तक्रार केलेली नव्हती. माझे मते सामनेवाले यांनी मला डावलुन इतर कामगारांना नोकरीत कायम केले. त्या कायम केलेल्या इतर कामगारांची नावे मी सांगु शकत नाही. त्या संदर्भातील यादी माझेकडे आहे व ती यादी मी पुढील तारखेस दाखल करण्यास तयार आहे.

**यावेळी सामनेवाले यांच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून दोन्ही पक्षांच्या संमतीने पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/—

( प्र. प्र. राजवैद्य )
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, सोलापूर.

सोलापूर.
दिनांक :— ०५/०४/२०२४.